**गणेशोत्सव हा “राज्य महोत्सव” साजरा करण्याच्या अनुषंगाने टपाल तिकिट व विशेष नाणे प्रसिध्द करणे यावरील खर्चास वित्तीय मान्यता देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग**

**शासन निर्णय क्र. संकीर्ण ८२२५/प्र.क्र.४०९(ई.१२६३३३३)/सां.का.४**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक : १० ऑगस्ट, २०२६

<u>वाचा</u> : १. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्णी ८२२५/प्र.क्र.४०९ (ई.१२६३३३३)/सां.का.४, दिनांक ११ ऑगस्ट, २०२५

२. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्णी ८२२५/प्र.क्र.४०९ (ई.१२६३३३३)/सां.का.४, दिनांक २४ ऑक्टोबर, २०२५

३. सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र.सां.का.सं./२१३१, दिनांक ०२ जुलै, २०२६.

**<u>प्रस्तावना :-</u>**

महाराष्ट्रात सार्वजनिक गणेशोत्सव मोठ्या प्रमाणात राज्याच्या विविध भागांमध्ये साजरा केला जातो. भक्ती व अध्यात्माला सामाजिक बाबींची जोड देणारा हा महोत्सव महाराष्ट्राच्या केवळ आर्थिक-सामाजिक व सांस्कृतिकच नाही तर भावनिक बंधाशी जोडला गेलेला आहे. सार्वजनिक गणेशोत्सवाचे हेच महत्त्व ओळखून, सार्वजनिक गणेशोत्सव हा "राज्य महोत्सव" म्हणून साजरा मान्यता देण्यात आली आहे. उपरोक्त संदर्भ क्र.०१ वरील शासन निर्णयातील अ.क्र. १ व २ अन्वये गणेशोत्सवानिमित टपाल टिकिट काढणे व विशेष नाणे प्रसिध्द करणे यासाठी प्रशासकीय मान्यता दिली होती तसेच संदर्भ क्र. ०२ वरील शासन निर्णयान्वये वित्तीय मान्यता देण्यात आली होती. तथापि, सदर कार्यवाही सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात पूर्ण न झाल्याने सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात टपाल तिकिट व विशेष नाणे प्रसिध्द करण्यावरील खर्चास वित्तीय मान्यता देण्याची विनंती संचालनालयाकडून करण्यात आली आहे. त्यानुषंगाने गणेशोत्सवानिमित्त टपाल तिकिट व विशेष नाणे प्रसिध्द करण्यावरील खर्चास वित्तीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्रातील सार्वजनिक गणेशोत्सव हा “राज्य महोत्सव” म्हणून साजरा करण्याच्या अनुषंगाने टपाल तिकिट व विशेष नाणे प्रसिध्द करणे यावरील खर्च रुपये ५५,००,०००/- ( अक्षरी रुपये पंचावन्न लक्ष फक्त ) इतक्या रकमेस या शासन निर्णयान्वये खालीलप्रमाणे वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| १ | गणेशोत्सव राज्य महोत्सव टपाल टिकिट काढणे. | १५,००,००० |
| २ | गणेशोत्सव राज्य महोत्सव विशेष नाणे प्रसिध्द करणे. | ४०,००,००० |
| | **एकूण रुपये** | **५५,००,०००** |

**०२.** सदर खर्च “मागणी क्र. झेडडी-०२, २२०५, कला व संस्कृती, १०२, कला व संस्कृती प्रचालन, (०२) राज्य नृत्य, नाट्य, तमाशा व संगीत महोत्सव, (०२) (०२) राज्य कला संस्कृति जतन, संवर्धन विविध महोत्सव तसेच इतर कार्यक्रम (कार्यक्रम) (२२०५ १५०७) - ५० इतर खर्च” या लेखाशिर्षाखाली सन २०२६-२७ या वर्षासाठी मंजूर असलेल्या आर्थिक तरतुदीतून भागविण्यात यावा.

**०३.** यासाठी संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांना नियंत्रण अधिकारी तसेच लेखाधिकारी, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

**०४.** सदर कार्यक्रमासाठी वितरीत करण्यात आलेल्या निधीच्या विनियोगानंतर संचालकांनी एक महिन्याच्या आत कार्यक्रम खर्चाच्या सविस्तर तपशीलाचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करावे.

**०५.** सदर खर्च वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/विनिमय, भाग २, दिनांक १७ एप्रिल, २०१५, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला, उपविभाग-३, अ.क्र. ४ परिच्छेद क्र. २७ (२) (अ) अन्वये प्रशासकीय विभागास प्राप्त अधिकारानुसार मंजूर करण्यात येत आहे.

**०६.** सदर शासन निर्णय वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र. ५१३/२०२६, व्यय-१५, दिनांक २३ जुलै, २०२६ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

**०७.** सदर प्रकरणी वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दिनांक ०९ एप्रिल, २०२६ मधील सर्व परिच्छेद परीशिष्टातील अटींनुसार कार्यवाही करण्याची जबाबदारी संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांची राहील.

**०८.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२६०८१०१७२३२९४२४३ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

DILIP SOPAN SOLASE

Digitally signed by DILIP SOPAN SOLASE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=TOURISM AND CULTURAL AFFAIRS,
2.5.4.20=D88CF2A56EDC338F09BD490729979CB0522F3B3817594F767716F4DFF3A1B161, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=AF039EE19AAD174683FF6B9738A6D180446F4C40E7376611B216C04C9C67E5AF, cn=DILIP SOPAN SOLASE
Date: 2026.08.10 17:24:25 +05'30'

**(दिलीप सो. सोळसे)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत:-**

१. मा. मंत्री (सांस्कृतिक कार्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. सचिव (सां.का.) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
३. उप सचिव (सां.का.४) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
४. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, जुने सचिवालय इमारत, पहिला मजला, एम. जी. रोड, मुंबई.
५. कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई

६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता ) - १, महाराष्ट्र राज्य, मुंबई
७. महालेखापाल (लेखापरीक्षा) - १, महाराष्ट्र राज्य, मुंबई
८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) - २, महाराष्ट्र राज्य, नागपूर
९. महालेखापाल (लेखापरीक्षा) - २, महाराष्ट्र राज्य, नागपूर
१०. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
११. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१२. निवडनस्ती, सां.का. ४